## निशाणी क्रमांक ७२ खालील आदेश

(दिनांक ०२ माहे मार्च २०२६ रोजी पारीत)

०१. वादींनी सदरच्या अर्जाद्वारे त्यांच्या पुराव्याची बाजू बंद करणारा आदेश रद्दबातल ठरवून त्यांना पुरावा सादर करण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी केलेली आहे.

०२. वादींनुसार, त्याने वाटपाचा आणि कब्जा मागणीचा दावा दाखल केलेला असून त्यामध्ये पुरावा सुरू आहे. त्यांच्यानुसार, वादी क्र. १ हा ह्वद्यविकाराने आजारी होता ज्यामुळे त्याच्या ह्वद्यविकारावर दिनांक १३.०७.२०२५ रोजी शस्त्रक्रिया करण्यात आली. तेव्हा तो रुग्णालयात दाखल होता आणि त्याला चार महिने आराम करण्याचा सल्ला देण्यात आला होता. तेव्हा तो दिनांक ३०.०९.२०२५ ते ०४.१०.२०२५ पर्यंत रुग्णालयात दाखल असल्याने आणि ह्वद्यास पेसमेकर बसविण्यात आलेले असल्याने विश्रांती घेण्यास सांगितले होते. ज्या दरम्यान वादी क्र. १ हा शासकीय नोकरीत असल्याने निवडणुकीच्या कर्तव्यावर नियुक्त केलेला होता. त्यामुळे ते न्यायालयात हजर होवून पुढील साक्ष पुरावा देवू शकला नव्हता. त्याने पुरावा देण्याचे टाळलेले नाही. तेव्हा त्यांच्यानुसार, त्यानां सदर दिलेल्या साक्षीदाराचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे. तेव्हा अटीतह त्यांना पुन्हा पुरावा सादर करण्यासाठी संधी मिळावी म्हणून त्यांच्या पुराव्याची बाजू बंद करणारा आदेश रद्दबातल ठरवावा आणि पुरावा सादर करण्यास परवानगी द्यावी, अशी त्यांनी विनंती केलेली आहे.

०३. प्रतिवादींनी सदरच्या अर्जाला एकतर अर्ज नामंजूर करावा किवा मंजूर करावा असे करण्यायोग्य दिसून आला तर वादींवर भरपूर परीव्यय लादून त्यांना भरपाई म्हणून द्यावा, अशी विनंती केलेली आहे.

०४.     वादींच्या वतीने वकील श्री. आय. व्ही. राजंवण यांना तर प्रतिवादींच्या वतीने वकील श्री. बी. एस. पोळ यांना ऐकले.

०५.     अभिलेखाचे अवलोकन केले असता हे सुस्पष्ट आहे की, दाव्यामध्ये दावा हा तीन प्रतिवादींनी दाखल केलेला असून तिघेही वयस्क आहे. त्यामुळे केवळ प्रतिवादी क्र. १ ह्रद्‌यविकाराने आजारी असल्यामूळे आणि त्याच्यावर शस्त्रक्रिया झालेली असल्याने त्याला चार महिन्यापर्यंत उपचार आणि आराम करण्याचा सल्ला दिलेला असल्यामुळे तो न्यायालयासमक्ष येवू शकला नाही हे मान्य केले तरी त्याच्याच म्हणण्याप्रमाणे तो दिनांक १६.०१.२०२६ ते ०९.०२.२०२६ च्या कालावधीमध्ये निवडणुकीच्या कर्तव्यावर हजर झालेला आहे आणि निवडणुक प्रक्रियेमुळे इतक्या मोठया कालावधीसाठी कोठल्याही कर्मचा—याला सतत कर्तव्या दिले जात नाही. अशा परिस्थितीमध्ये हे सुस्पष्ट होते की, वादी क्र. १ हा न्यायालयासमक्ष येण्याच्या स्थितीमध्ये होता.

०६.     उपरोक्त काहीही असलेतरी हे नाकारण्याचे कारण नाही की, दावा सिद्ध करण्यासाठी आवश्यक असणा—या पक्षकारांचा पुरावा सादर करण्याची संधी प्रत्येक पक्षकाराला मिळावयास हवी. अन्यता अपु—या पुराव्या अभावी कोणत्याही विवादाचा निपटारा हा गुणवत्तेवर आणि अंतिमरित्या होत नाही. त्यामुळे वादींना अटीतह पुरावा सादर करण्याची संधी देणे आवश्यक आहे. परंतु त्यांची दिरंगाईची कृती लक्षात घेतली असता आणि त्या दरम्यान प्रतिवादींकडून पुरावा सादर होवून तो वादींच्या उलट तपासणी विना पूढे अभिलेखावर घेण्यात आलेला आहे, हे लक्षात घेता सदर प्रतिवादींना भरपाई मिळणे आवश्यक आहे. शिवाय वादींची दिरंगाई देखील सार्वजनिक वेळ, पैसा आणि श्रम वाया घालविण्यास कारणीभूत ठरलेली असल्याने त्या कारणावर देखील त्यांच्यावर

परीव्यय लादणे आवश्यक आहे. तेव्हा अर्ज मंजूर करतांना खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे:

**आदेश**

१. अर्ज परिव्यय रक्कम रुपये ८००/– लादून मंजूर करण्यात येत आहे;

२. वादीने पुढील तारखेपर्यंत परिव्यय रकमेपैकी रक्कम रुपये ४००/– प्रतिवादीच्या साक्षीदारास भरपाई म्हणून हस्ते दिल्यावरुन किंवा देण्यासाठी न्यायालयात जमा केल्यावरुन आणि उर्वरीत शासन जमा केल्यावरुन वादीच्या पुराव्याचा बंद करण्याचा केलेला आदेश रद्दबातल ठरविला जाईल आणि त्यांनी या अर्जासोबत ज्या साक्षीदारांच्या पुराव्याची प्रतिज्ञापत्रे दाखल केलेली आहेत त्यास पुरावा सादर करण्याच्या हद्दीपर्यंत परवानगी देण्यात येत आहे;

३. परिव्यय हा वादी/अर्जदारावर राहील.

Digitally signed by BHAGWAN DHONDIRAM PANDIT
Date: 2026.03.02 17:47:06 +0530

दिनांक: ०२.०३.२०२६

**(भगवान धों. पंडित)**
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
भूम, जि. उस्मानाबाद.

CERTIFICATE

I affirm that the contents of this P D F file order/ judgment are same word to word as per the original order/judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | R.H.Botre (Grade-II) |
| Name of Court | : | Civil Court Senior Division Bhoom Tq. Bhoom Dist.Osmanabad. |
| Order/ Judgment date | : | 02.03.2026 |
| Order/ Judgment signed by the Presiding Officer on | : | 02.03.2026 |
| Order/ Judgment uploaded on | : | 02.03.2026 |